MHBU080008152024

दाखल तारीखः– २६/०६/२०२४
नोंदणी तारीखः– २६/०६/२०२४
निर्णय तारीखः– १०/०४/२०२६
कालावधीः– वर्ष महिने दिवस
०१ ०९ १४

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदुरा, जि.बुलडाणा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी– किरण वि. लुंगे)

**नि.फौ.प्रकरण क्र.१३२/२०२४** **निशाणी क्र.२०**

| | | |
|---|---|---|
| **सरकारपक्ष** | : | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, नांदुरा, जि. बुलडाणा. |
| सरकारपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता | : | **श्री.ए.एस.वर्पे साहेब** |
| | **- विरुध्द -** | |
| **आरोपी** | : | **भागवत रघुनाथ बगाडे,**<br>वय – ४२ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>रा. अलमपुर, ता.नांदुरा, जि.बुलढाणा. |
| आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ | : | **श्री.एन.एस.सातसुरे साहेब.** |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा तारीख | : | २८/०१/२०२४ |
| छापील प्रथम खबर तारीख | : | २८/०१/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | २६/०६/२०२४ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | : | ११/०३/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | १०/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १०/०४/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| शिक्षेची तारीख, लागु असल्यास | : | –– |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | दोषारोप ठेवण्यात आलेले कलम | निर्दोष मुक्त किंवा शिक्षा कसे | ठोठावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या अन्वये खटल्याच्या दरम्यानचा तुरुंगवासात काढलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भागवत रघुनाथ बगाडे | सुचनापत्रावर सोडले | ११/०३/२०२६ | ३२४, ३२३, ५०४, ५०६ भा.द.वी. प्रमाणे | निर्दोष मुक्त | –– | –– |

### सरकारपक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकार पक्ष

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | पद्मा भागवत बगाडे | फिर्यादी (नि.क्र.१६) |

### ब.बचाव पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### सरकार पक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांक

### अ.सरकारपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १७ | फिर्यादवरील फिर्यादीची सही |

| | | |
|---|---|---|
| २ | १८ | छापील प्रथम खबरवरील फिर्यादीची सही |

**ब.बचावपक्षः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क.न्यायालयीन निशाणीः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड.वस्तुः–**

| अ.क्र. | वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**न्यायनिर्णय**

(पारीत दिनांक १०/०४/२०२६)

आरोपी हा भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि असे संबोधण्यात येईल) चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयाच्या खटल्यास सामोरे जात आहेत.

२) **सरकारपक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे :-**

दि.२८/०१/२०२४ रोजी, दुपारी १२.३० वा.चे सुमारास पद्मा भागवत बगाडे (यापुढे फिर्यादी म्हणून उल्लेख केला जाईल) ही तिच्या घरी असतांना तिचा पती म्हणजेच आरोपी दारु पिवुन घरी आला व काही कारण नसतांना तिला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादी आरोपीला समजाविण्याकरीता गेली असता आरोपीने काही न ऐकता खाली पडलेला दगड उचलुन फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले. त्यानंतर, फिर्यादीने पो.स्टे.ला फिर्याद दिली.

३) सदर फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गुन्हा क्र.७०/२०२४, कलम ३२४, ५०४, ५०६ भा.दं.वि. अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासा दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले व साक्षीदारांचे

जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे कलम ३२४, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हयासाठी दोषारोपपत्र दाखल केले.

४) मी आरोपीविरुध्द **निशाणी क्र.१२** भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्ह्याचा दोषारोप निश्चित करून तो त्यास त्याचे मातृभाषेत समजावुन सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल असल्याचे निवेदन दिल्यामुळे संपरीक्षा घेण्यात आली. आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी सरकार पक्षातर्फे फिर्यादीची साक्ष नोंदविली. आरोपीचे विरुध्द गुन्हयाच्या संदर्भाने कोणताही पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३, चे कलम ३१३ (१) (ब) प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५) मी दोन्ही पक्षाचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला, तसेच सरकार पक्षातर्फे नोंदविण्यात आलेला साक्षी पुरावा वाचला असता खालील मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, दि.२८/०१/२०२४ रोजी १२:३० वा.चे सुमारास, मौजे अलमपुर ता.नांदुरा, जि.बुलडाणा येथे आरोपीने फिर्यादीला दगडाने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचवली आणि त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम **३२४** नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपीने फिर्यादीला लाथा बुक्यांनी मारहाण इच्छापूर्वक दुखापत पोहचवली आणि त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम **३२३** नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| ३. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपीने फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान करून प्रक्षोभित केले आणि प्रक्षोभनामुळे त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य अपराध घडावा असा त्यामागे उद्देश ठेवला आणि त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम **५०४** नुसार गुन्हा केला? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून त्याचे मनात भिती उत्पन्न केली व त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम **५०६** नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| ५. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

६) फिर्यादी व आरोपीने एकत्रित पुरसिस दाखल करुन कळविले की, आरोपी व फिर्यादी पती पत्नी आहेत. फिर्यादीची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार राहिलेली नाही. फिर्यादी व आरोपी मध्ये कोणताही वाद राहिलेला नाही. त्यामुळे, सरकार पक्षाचा पुढील पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत :-**

७) वरील मुद्दे ऐकमेकांशी संलग्न असल्याने, तसेच त्यावरील पुरावा एकच असल्याने त्यांचे विवेचन एकत्रीतरीत्या करण्यात येत आहे.

८) फिर्यादी पद्मा भागवत बगाडे (स.सा.क्र.१) हिने पुराव्यात कथन केले कि, आरोपी तिचा पती आहे. घटना ही अंदाजे दोन वर्षापुर्वी त्याच्या घरी घडली होती. त्यावेळी आरोपीची व तिची शाब्दीक बाचाबाची झाली होती. त्यानंतर तिने रागाच्या भरात पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. अभिलेखावरील लेखी फिर्याद व छापील प्रथम खबर वरील सही त्याने ओळखली, परंतु मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. फिर्यादीने पुढे असे कथन केले की, ''असे काही घडले नाही की, दि.२८/०१/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा.चे सुमारास मी घरी असतांना आरोपी दारु पिवुन आला व काही कारण नसतांना मला शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली व मी समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने खाली पडलेला दगड उचलुन माझ्या डोक्यावर मारला, त्यामुळे मी पो.स्टे. ला आरोपी विरुध्द फिर्याद दिली होती''. फिर्यादी ही सरकार पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने तिला भारतीय साक्षी पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ अन्वये उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारले. परंतु, फिर्यादीने घटनेबाबत सरकारपक्षाचे कथनाप्रमाणे काहीही साक्ष दिली नाही. तसेच, मान्य केले की, तिचे आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी झालेले आहे व त्याला आरोपीविरुध्द पुढे केस

चालवायची नाही.

९) फिर्यादीने तिचे लेखी फिर्याद व सरकार पक्षाचे कथनास दुजोरा न दिल्यामुळे फिर्याद सिध्द झाली नाही. तसेच, फिर्यादी व आरोपी यांचे मध्ये आपसी तडजोड झाल्याबाबत पुरसीस दाखल केली आहे. त्यामुळे, दि.२८/०१/२०२४ रोजी १२:३० वा.चे सुमारास, मौजे अलमपुर ता.नांदुरा, जि.बुलडाणा येथे आरोपीने फिर्यादीला दगडाने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचवली, फिर्यादीला लाथा बुक्यांनी मारहाण इच्छापूर्वक दुखापत पोहचवली, फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान करून प्रक्षोभित केले आणि प्रक्षोभनामुळे त्याच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य अपराध घडावा असा त्यामागे उद्देश ठेवला, फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून त्याचे मनात भिती उत्पन्न केली, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता सरकार पक्षाचे कथनाप्रमाणे आरोपींनी भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयासाठी लागणारे आवश्यक घटक कोणताही ठोस पुरावा देवुन सिध्द करू शकलेले नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर **नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ बाबत :–</u>**

१०) मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी हे सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये या न्यायनिर्णया विरुध्द सरकार पक्षाने अपील किंवा इतर कार्यवाही केल्यास त्यामध्ये हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीने जामीन देणे आवश्यक आहे. दोषारोपपत्रासोबत दाखल केलेल्या मुद्देमाल पावती मध्ये एक दगड मुल्यहीन व निरउपयोगी असल्याबाबत नमुद आहे. त्यामुळे, सदर मुद्देमाल अपिलाचा कालावधी संपल्यानंतर नष्ट करणे आवश्यक आहे. सबब, मुद्दा क्र.५ चे उत्तराकरीता खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **भागवत रघुनाथ बगाडे** यास फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) च्या तरतुदीनुसार, भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ या दंडनिय अपराधातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक दगड मुल्यहीन व निरउपयोगी असल्याने प्रस्तुत प्रकरणाचा अपीलाचा कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ च्या तरतुदीनुसार विद्यमान वरिष्ठ न्यायालयातील अपीलमध्ये किंवा न्यायनिर्णय विरुध्द याचीकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरीता आरोपीने पुढील सहा महिन्यापर्यंत कायम राहील असा रुपये १५,०००/- (रु.पंधरा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढ्याच रकमेचा जामीन दाखल करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

LUNGE KIRAN VITTHAL
Digitally signed by LUNGE KIRAN VITTHAL
Date: 2026.04.10 17:39:29 +0530

दिनांक-१०/०४/२०२६ (किरण वि. लुंगे )

ठिकाण-नांदुरा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

नांदुरा, जि.बुलडाणा.